# -: परिपत्रक :-

विषय:- विविध विद्याशाखा / विभागांतर्गत विविध विषयातील अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत...

संदर्भ:- या कार्यालयाचे पत्र क्र.३८१५, दि.२२/०७/२०१५.

विद्यापीठ संलग्न महाविद्यालयं व संकुलातील विभाग प्रमुखांना या परिपत्रक कळविण्यात येते की, शैक्षणिक विभागामध्यं वेगवेगळ्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देताना शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार व आरक्षणाच्या टक्केवारीनुसार प्रवेश देणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने आपणाला यापूर्वीच संदर्भिय पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरी आपणास पुनःश्च कळविण्यात येते की.

शासनाने दिलेल्या आदेशानुसार व आरक्षणाच्या टक्केवारीनुसार पुढीलप्रमाणे विद्यार्थी प्रवेशासाठी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग | | आरक्षणानुसार टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | S.C | १३% |
| २. | अनुसूचित जमाती | S.T. | ७% |
| ३. | विमुक्त जाती (अ) | VJ-A | ३% |
| ४. | भटक्या जमाती (ब) | NT-B | २.५% |
| ५. | भटक्या जमाती (क) | NT-C | ३.५% |
| ६. | भटक्या जमाती (ड) | NT-D | २% |
| ७. | इतर मागास वर्ग | OBC | १९% |
| ८. | सर्वसाधारण (खुला) | OPEN | ५०% |

शासन निर्णयानुसार विविध विषयाच्या अभ्यासक्रमातील प्रवेशासाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ५०% व मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ५०% जागा आरक्षित ठेवणं आवश्यक आहे. शासन निर्णय क्र.जीईसी १०००/(१२३/२०००) तांशि - १ दि.१७/०४/२००० नुसार पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता महिलांसाठी ३०% जागा आरक्षित ठेवण्यात याव्यात, तसेच अपंगासाठी ३% टक्के जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

**प्रवेशासाठी आवश्यक पध्दत पुढीलप्रमाणे-**

१. विशेष मागास प्रवर्ग व इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेशाबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. टीईएम ३३९७/१२९२६/(१०८६)/तांशि-१ दि.११ जुलै ,१९९७ नुसार दिलेल्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

२. विशेष मागास प्रवर्गात ज्या जाती आहेत त्यापैकी काही जाती इतर मागासवर्गीयांमध्ये समाविष्ट होत्या सुरूवातीस विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र धारक उमेदवारांचा जात ज्या मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट होती. त्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी पात्र समजण्यात यावी.

।कृ.मा.प।

18/10/15

३. शासनाने दिलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार एकूण ५० टक्के जागा आरक्षित करण्यात याव्यात सदर आरक्षण प्रत्येक संस्थेमध्ये अभ्यासक्रम निहाय राहील.

४. गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण क्षमतेच्या जास्तीत जास्त २% पर्यंत विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

५. रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना कमाल २% जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागा इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करून भरण्यात याव्यात.

६. ज्या विषयात सर्व प्रवर्गासाठी जागा उपलब्ध होत नसतील तेथे आरक्षणामध्ये वर उल्लेख केलेल्या आरक्षण क्रमानुसार प्रथम अ.जाती, अ.जमाती, विजा (अ) ,भज (ब),भज (क), भज(ड), व इमाव या क्रमाने आरक्षण टक्केवारी विचारात घेऊन जागा आरक्षित ठेवण्यात याव्यात.

७. शैक्षणिक विभागामार्फत येणाऱ्या बिगर राखीव जागा या प्रथमतः भरण्यात याव्यात यामध्ये गुणवत्तेनुसार असणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा देखील समावेश असेल या विद्यार्थ्यांच्या समावेश आरक्षणामध्ये करण्यात येवू नये. उर्वरित जागा आरक्षणानुसार भरण्यात याव्यात. शैक्षणिक विभागात प्रवेश देताना एखादया प्रवर्गाचा उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांच्या इतर गटातील अनुसुचित जाती,अनुसुचित जमाती, विमुक्त जाती,भटक्या जमाती व इतर मागासवर्ग यामधून शासन निर्णयानुसार अंतर्गत बदलाने उमेदवारांना प्रवेश देऊन आरक्षण पूर्ण करण्यात यावे.

८. महाराष्ट्र शासनाच्या आरक्षण धोरणानुसार क्रिमीलेअरचे तत्व अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती वगळता इतर सर्व प्रवर्गांना लागू राहील.

९. महाराष्ट्र राज्याबाहेरील मागासवर्गीय उमेदवारांना आरक्षणाच्या कोणत्याही सवलती /फायदे प्राप्त होणार नाहीत.

१०. संवैधानिक आरक्षण कुठल्याही परिस्थितीत ५०% टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

तरी संलग्न महाविद्यालये व संकुलातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी उक्तप्रमाणे शासनाने दिलेल्या आदेशानुसार व उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. टीईएम ३३९७/१२९२६/(९०८६)/तांशि-१ दि.११ जुलै. १९९७ नुसार प्रवेशाबाबतची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

जावक क्र.सोविसो/म.वि.वि.मं./विशेष कक्ष/२०१६-१७/9495
दिनांक :- - 7 OCT 2016

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

सोबत- वरीलप्रमाणे

प्रत:-
१) मा.प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालये, सोलापूर विद्यापीठ,सोलापूर.
२) मा.संचालक, सर्व संलग्नित संकुले, सोलापूर विद्यापीठ,सोलापूर.
3) प्रवेश विभाग ,सोलापूर विद्यापीठ,सोलापूर.

NAAC Co-Ordinator
U.E.S. Mahila Mahavidyalaya
Solapur.

U.E.S. Mahila Mahavidyalaya Solapur.

I/c. Principal
U. E. S. Mahila Mahavidyalaya.
Solapur.

2.1.2 The number of seats earmarked for the reserved category as per GOI or State Government rule and the number of students admitted from the reserved category.

**Circular**

Subject: - admission to study in various subjects under various Faculties / Departments

Reference: Letter from this office. 3815, dated 22/07/2015.

The Heads of Departments in University Affiliated Colleges and Complexes are required to grant admission to students for different degrees and post-graduate courses in this circular according to the percentage of reservations as per the order issued by the Government from time to time. Accordingly, we have already issued the reference orders. However, you are notified to do something for student admission as per the order given by the government and according to the percentage of reservations is necessary.

| Sr. No | category | | Reservation Percentage |
|---|---|---|---|
| 1 | Scheduled Cast | Sc | 13% |
| 2 | Scheduled Tribes | S.T. | 7% |
| 3 | Denotified Tribes-A | VJ(A) | 3% |
| 4 | Nomadic Tribes-B | NT(B) | 2.5% |
| 5 | Nomadic Tribes-C | NT-C | 3.5% |
| 6 | Nomadic Tribes-D | NT-D | 2% |
| 7 | Other Backwards Class | OBC | 19% |
| 8 | General Open | Open | 50% |

50% for open category students for admission to various subject courses as per Govt. 50% of seats must be reserved for backward students. Govt. Decision No. JOIC 1000 (123/2000) Term- 1 dt. As of 17/04/2000 30% of seats should be reserved for women for admission to degree courses 3% of seats should be reserved for disabled.

The procedure required for admission is as before-

1. Higher and Education Department Govt Decision for Admission to Special Backward Category and Other Category Students. Tome 3397/12926/ (9086)/

provision.

2. The castes included in the Special Backward category included in the Other Backward Classes are those holding Special Backward Category Certificates Viz. Eligibility for this reservation

3. Govt should look into every institution of reservation

4. After the admission process as per the merit list, if some seats remain vacant, maximum 28 candidates of total capacity should be given priority for admission on that seat

5. After admitting a maximum 2% of seats to Special Backward Category candidates on vacant seats If remaining, these seats are according to the merit of all other backward candidates should come

6. In the subject where seats are not available for all the categories, the reservation will be first A. Caste, A. Tribe, Bina (A), Man (Y), Bhan (F) in order. (4) In keeping the seat reserved by considering the percentage

7. The non-reserved seats coming through the education department should be filled first, including those on merit Backward class students will also be included, these students should not be included in the reservation. the rest Seats should be filled as per reservation. Don't be generous while giving admission to the academic department Scheduled Castes, Scheduled Tribes, Exempt Castes, Bhatakya Tribes etc. from other backward groups if available Reservation by admitting candidates from other backward classes through internal changes as per government decision

8. According to the reservation policy of the Government of Maharashtra, the principle of the cream layer will be applicable to Scheduled Castes and Scheduled Tribes.

9. Backward-class candidates from outside the state of Maharashtra will not get any form of reservation

10. Make sure that the constitutional reservation does not exceed 50% in any case

However, as per the order issued by the Government for Degree and Post Graduate studies in affiliated colleges and complexes and Higher and Technical Education Department Government Decision No. TEM 3397/12926/ (9086)/ M-1. 1. 197

U.E.S. Mahila Mahavidyalaya Solapur.

I/c. Principal
U. E. S. Mahila Mahavidyalaya,

महाराष्ट्र शासन
सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

क्रमांक:अशैसं-२००९/६३१/प्र.क्र.३९/२००९/का.१,                    दिनांक :- २७ फेब्रुवारी, २००९.

## अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र

युनियन एज्युकेशन सोसायटी, १४१-अ, सिध्देश्वर पेठ, सोलापूर या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस धार्मिक व भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.१९.११.२००७ रोजी अर्ज सादर केला होता. दि.१६.१.२००९ रोजी माझ्या समक्ष संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरीकरणाच्या आधारे सदर संस्था ही अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या धार्मिक (मुस्लिम) व भाषिक (उर्दू) अल्पसंख्याकामधील व्यक्तींकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचालित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामत: सदर संस्था ही धार्मिक (मुस्लिम) व भाषिक (उर्दू) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला धार्मिक व भाषिक अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचालित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला धार्मिक व भाषिक अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्दिशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

टी.एफ. थेकेकरा

( टी. एफ. थेकेकरा )
सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

अल्पसंख्याक विकास विभाग
महाराष्ट्र शासन

NAAC Co-Ordinator
U.E.S. Mahila Mahavidyalaya
Solapur

I/c. Principal
U. E. S. Mahila Mahavidyalaya,
Solapur

As the educational institution is recognized by the state government as a religious minority, the state government's category reservation rules are not applicable for first-year admission.

## Government of Maharashtra

Competent Authority and Principal Secretary

Minority Development Department, Ministry,

Mumbai 400 032.

No-2009/631/ P.Cr.39/2009/ K.1, Date: - 27th February, 2009,

## Minority Status Recognition Certificate

Union Education Society, 141- A, Siddheshwar Peth, Solapur, an educational institution for obtaining a certificate of recognition for their institution as a Religious and Linguistic Minority Educational Institution. The application was submitted on 19.11.2007. Based on the presentation made by the office bearers of the organization during the hearing held before me on 16.1.2009, the said organization is Minority Development Department, Government Decision, no. Ashas-2008/ P.No. 133/2008/ Ka.1, dt. I am satisfied that under the criteria prescribed vide July 4, 2008, it is permissible for the State Government to establish and operate an institution belonging to religious (Muslim) and linguistic (Urdu) minorities declared by the State Government by a person or a community of persons. Consequently, the said institution is hereby declared to be a religious (Muslim) and linguistic (Urdu) minority educational institution.

This certificate will be applicable only to the state of Maharashtra. The religious non-linguistic minority status granted to the said institution shall be applicable to all the academic branches operated by the institution.

The religious and linguistic minority status hereby granted to the above-mentioned educational institution shall be valid from every academic year 2008-09, the concerned institution vide Minority Development Department, Government Decision no. Ashans-2008/ Pro. No. 133/2008/ Ka. 1, dated Compliance with the criteria and conditions prescribed vide July 4, 2008, shall remain mandatory.

(T.F. Dhekekara), Competent
Authority and Principal Secretary
Minority Development Department,
Ministry of Government of
Maharashtra, Mumbai - 400 032.

U.E.S. Mahila Mahavidyalaya Solapur.

I/c. Principal
U. E. S. Mahila Mahavidyalaya,
Solapur